आ.क्र. ८/ ९५-९६
८-२-९६

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका
कै.माऊसाहेब शिरोळे भवन, शिवाजीनगर, पुणे-५.
जावक क्रमांक - साप्राशा/ ५५५९ /१९९५-९६.
पुणे, दिनांक - ८/२/९६

शाळा प्रमुख,
महर्षि कर्वे स्त्री शिक्षण संस्थेची (मराठी माध्यम)
प्राथमिक शाळा, कर्वेनगर, पुणे ४११०५२ यांस -

विषय - खाजगी प्राथमिक शाळेस मान्यता देणेबाबत.
संदर्भ - मा. शिक्षण मंडळ ठराव क्र.१९७ दि.२६-१२-९५.

तुमचे शाळेस सन ९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून खालील अटींची पूर्तता करण्याचे अटीवर मान्यता देण्यात येत आहे. सदरची मान्यता प्रत्यक्ष सुरु असलेल्या इ.१ ली ते ४थी च्या वर्गाकरिता असेल.

सदर संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२) शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे.

३) शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यवसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

४) संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन, विषयक सुविधा इ. शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमल - बजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वियन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक त्या सुविधा पुरविल्या पाहिजेत.

६) संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी / कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंद वहया अद्यावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वीत ठेवल्या पाहिजेत.

७) शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

८) संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादींमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

९) संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे कार्यपध्दतीचे नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

१०) संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देताना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरित परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

११) शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

सदर अटींची पूर्तता न केल्यास शाळेस दिलेल्या मान्यतेबाबत फेरविचार करणेत येईल याची नोंद घ्यावी.

तरी तुमचे शाळेतील खालीलप्रमाणे माहिती वेगळ्या तक्त्यात दोन प्रतीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

तक्ता क्र.१

| इयत्ता | तुकडी | विद्यार्थी | | | सरासरी हजेरी |
|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | एकूण | |
| | | | | | |
| एकूण | | | | | |

तक्ता क्र.२

| अ. क्र. | शिक्षकाचे नाव | जात | जन्म दिनांक | नोकरीस लागल्याचा दिनांक | शैक्षणिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|

कळवे, दि. ३।२।८९

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.